**नि. फौ. ख. क्र.३२०/२०१७**

सरकार वि. अजित कारंडे व इतर.

**नि.क्र.४१ च्या पुढे.**

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ नामे बायडाबाई महादेव कारंडे यांचा पुढील सरतपास अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**</u>

२. आता मला पी. आर.नं.११/२०२२ मधील दगड दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास <u>**आर्टीकल अ**</u> देण्यात येते. मी आरोपींना ओळखू शकते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

<u>**उलटतपास आरोपींतर्फे श्री.एच.डी.नरुटे, विधीज्ञ यांचेमार्फत –**</u>

३. मला लिहिता वाचता येत नाही. बेबाबाई कारंडे माझ्या पतीची पहिली पत्नी होती. ती तिच्या माहेरी काटी गावी राहते. मला माझ्या लग्नाची तारीख सांगता येणार नाही. पोपट कारंडे, दिलीप कारंडे, सुनिल कारंडे, महादेव कारंडे हे माझे दिर आहेत. आमच्या जमिनीचे वाटप झाले का कसे मला माहिती नाही. आरोपींचे व आमचे घर जवळजवळ आहे. आमच्या घराजवळ निमसाखर शेळगांव डांबरी रस्ता आहे. माझ्या घरापासून अर्धा कि.मी. अंतरावर सामाईक विहीर आहे. त्या विहीरीवर सर्व दिरांच्या माझ्या पतीसह वेगळया मोटरी आहेत. शेतीची सगळयात मिळून एक मोटर आहे. विहीरीच्या कडेला मुरूमाचे दगड आहेत.

४. कथीत घटनेदिवशी माझ्या भावाची भांडगांव येथे जत्रा होती. मी व माझे पती सकाळी यात्रेला गेलो होतो. सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत घरी आलो. हे म्हणणे खरे नाही की, यात्रेत माझे पती दारू पिले होते. माझे पती दारू पिले होते का कसे मला माहिती नाही. आरोपींचा व आमचा सामाईक विहीरीचा वाद चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की,

माझ्या पतीने दिलीप याची मोटर विहीरीतून काढून टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की, विहीरीतून पायपा माझ्या पतीने उपसल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती विहीरीवरील मुरूमावरून पाईप वडताना खाली पडले होते व त्यांना जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, २०१७ साली पोपटचे व माझे पतीचे संबंध चांगले होते. विनोद हा माझ्या पतीसोबत पोलीस स्टेशनला गेला होता. त्याने पोलीस स्टेशनला मदत केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबातील मजकूर विनोदने पोलीसांना सांगितला. मागच्या तारखेला फिर्यादीतील मजकूर मला पहिल्यांदा सरकारी वकीलांनी वाचून दाखविला. विहीरीवरील पाण्याच्या मोटारी आकडा टाकून लावलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीत काय मजकूर लिहिला याची मला वैयक्तीक माहिती नाही. शिवाजी शेळके हे आमचे पाहुणे आहेत. मी बबन दिलावर शेख याला पाहिले आहे. तो गावात राहतो. विष्णू पवार हा वस्तीवर राहतो. पोलीसांनी जबाब, पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये केला.

५. नेमके किती तारखेला पोलीस स्टेशनला गेलो हे मला सांगता येणार नाही. किती वाजता दवाखान्यात गेलो याची नेमकी वेळ मला सांगता येणार नाही. मी डॉक्टरांना माहिती दिली. मी डॉक्टरांना अजितने माझ्या पतीला दगड मारला असे सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. घटना घडल्याची व फिर्याद दिल्याची तारीख माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०५/२०१७ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता विहिरीचे पाण्याची मोटार चालू करण्यासाठी माझे पती गेले होते, त्यानंतर विहीरीचे ठिकाणाहून आरडाओरडाचा आवाज आला, त्यानंतर मी विहीरीच्या ठिकाणी गेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी आरडाओरडा चालू होता, आरोपी अजित व दिलीप हे माझ्या पतीला खाली पाडून मारहाण करत होते, माझ्या पतीचे डाव्या बाजूची बरगडी फ्रॅक्चर झाली, माझ्या पतीला घरी आणले व दवाखान्यात नेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दुस–या दिवशी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली, अजित याने दगड मारल्यामुळे माझ्या पतीची बरगडी फ्रॅक्चर झाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पुन्हा येवून घटनास्थळ पंचनामा केला, मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत

आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०४/१०/२०२५**